आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१ जुलै २०२४ - सोमवार

राज्यातल्या निमशासकीय आणि अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय पुढच्या तीन महिन्यांच्या आत घेतला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली.  १ नोव्हेंबर २००५ पूर्वी निघालेल्या जाहिरातीनुसार त्यानंतरच्या कालावधीत सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना याचा लाभ घेता येईल. यासंदर्भात संजय केळकर, बाळासाहेब थोरात, आशिष शेलार यांनी प्रश्न-उपप्रश्न विचारले होते.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय आणि आशियाई स्तरावर पुरस्कार पटकावणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत मंत्रिमंडळाने एक सर्वसमावेशक धोरण ठरवलं असून योग्य प्रक्रिया पूर्ण करून या अधिवेशनात याबाबतचा शासन निर्णय आणला जाईल, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली. आमदार प्रवीण दटके यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

२०१८ मध्ये आलेल्या दोन शासन निर्णयांद्वारे एकंदर ३३ खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यात आल्याची माहिती पाटील यांनी दिली.

टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने विजेतेपद मिळवल्याच्या पार्श्वभूमीवर, अभिनंदन प्रस्ताव मंजूर करून तो भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला पाठवण्याची सूचना आज विधान परिषदेत करण्यात आली.

मुंबई ते मोरा फेरी बोटीवरच्या कामगारांना, आर्थिक मदत किंवा कर सवलतीची कोणतीही मागणी आलेली नसल्याची माहिती संबंधित खात्याचे मंत्री संजय बनसोडे यांच्या वतीने उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. यावर विरोधी पक्षांनी पुन्हा गदारोळ आणि घोषणाबाजी करून सभात्याग केला. या प्रश्नाबाबत सहानुभूतीने विचार करून बैठक घेऊ, असं आश्वासन पाटील

यांनी दिलं. विविध परीक्षांमधल्या पेपरफुटीच्या निषेधात विरोधी पक्षांच्या आमदारांनी विधीमंडळ आवारामधे निदर्शनं केली.

<><><><><>

राज्यात स्पर्धा परीक्षांमध्ये गैरप्रकार रोखण्यासाठी या अधिवेशनात नवा कायदा मांडण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बातमीदारांशी बोलताना दिली. सरकारने गेल्या अडीच वर्षात विक्रमी १ लाख ८ हजार नोकऱ्या दिल्या आहेत. या सर्व परीक्षा पारदर्शी पद्धतीने पार पडल्या असून लवकरच वर्ग क पदभरती राज्य लोकसेवा आयोगाकडे देण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

नवे फौजदारी कायदे आजपासून लागू झाले असून  त्या अनुषंगाने पोर्टल तयार करण्यात आलं आहे, असं फडणवीस म्हणाले. तसंच, हे कायदे केल्याबद्दल त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचं अभिनंदन देखील फडणवीस यांनी यावेळी केलं.

<><><><><>

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम हे तीन नवे फौजदारी कायदे आजपासून देशभरात लागू झाले.

या फौजदारी कायद्यांचा उद्देश शिक्षा देणं नसून न्याय देणं आहे, असं सरकारनं म्हटलं आहे. त्यामुळे विधायक परिणाम साधण्याच्या उद्देशाने अनेक वेगवेगळ्या उपायांची तरतूद या फौजदारी कायद्यांमधे केली आहे.

नवीन कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आणि जनजागृतीसाठी नांदेड जिल्हा पोलीस दल जिल्ह्यातल्या विविध पोलीस ठाण्यांमध्ये आज कार्यक्रम आणि बैठका

घेणार आहे. मुंबईतही या कायद्यांबद्दल जनजागृती करण्यासाठी केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयाने  काल परिषदेचं आयोजन केलं होतं.

<><><><>

विधान परिषदेच्या ४ मतदारसंघातल्या निवडणुकीची मतमोजणी आज सकाळी सुरु झाली. कोकण पदवीधर, मुंबई पदवीधर आणि मुंबई शिक्षक मतदारसंघ या तीन मतदार संघांची मतमोजणी नवीमुंबईत नेरुळ इथं होत असून मतपत्रिकांची प्राथमिक मोजणी पूर्ण झाली आहे.

नाशिक शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणीही आज होत आहे.

<><><><>

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत दंतवैद्यकीय उपचारही समाविष्ट करण्याची घोषणा सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी आज विधान परिषदेत केली. ही योजना तळागाळापर्यंत पोचवण्यासाठी खासगी रुग्णालयांपर्यंत पोहोचून शिष्टमंडळाद्वारे त्यांच्याशी संवाद साधण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं.

मुंबईतल्या झोपडपट्ट्यांच्या तिसऱ्या-चौथ्या मजल्याचं सर्वेक्षण करण्यासाठी वरिष्ठ आयएएस अधिका-यांची नियुक्ती करु, आणि चौकशी अहवाल पुढच्या अधिवेशनात सादर करु, असं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिलं.

<><><><>

माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंती दिनानिमित्त आज राज्यात कृषी दिन साजरा करण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार,तसंच  उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाईक यांच्या

प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन केलं. जिल्हा मुख्यालयांमधे तसंच कृषि उत्पन्न बाजार समित्यांमधेही दिवंगत नाईक यांना आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाबद्दल मांडण्यात आलेल्या आभारप्रस्तावावर चर्चा सुरु आहे.

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ‘नीट’ परीक्षेतल्या कथित गैरप्रकारावर दिवसभराच्या चर्चेची मागणी केली.

**//<><><><><>//**